# वार्षिक सर्वसाधारण सभेचे परिपत्रक
## (फक्त सभासदांकरिता)

श्री. पांजरापोळ (गोरक्षण) संस्था, अहमदनगर या संस्थेची सन २०२०-२०२१ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा कोरोना विषाणूच्या महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या आदेशास आधिन राहून गुरुवार दि. ३१/०३/२०२२ रोजी दु. ५.०० वा. पांजरापोळ (गोरक्षण) संस्था, अहमदनगर संचलित रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्ट बहुउद्देशीय केंद्र, अरणगाव रोड, अहमदनगर येथे आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेच्या वेळी अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती करण्यात येत आहे.

### सभेपुढील विषय

१. मागील दि. ३१/०३/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२०-२०२१ सालचा ऑडीटर यांनी तपासलेला ताळेबंद व उत्पन्न खर्चाचे हिशोब पत्रक मंजूर करणे व ऑडीटर यांच्या रिपोर्टची नोंद घेणे.

३. सन २०२१-२०२२ सालाकरिता ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचा मुशाहिरा ठरविणे.

४. मे. अध्यक्ष साहेबांचे परवानगीने आयत्यावेळी सभेपुढे येणाऱ्या विषयाबाबत विचार करणे.

स्थळ : अहमदनगर
दिनांक :१७/०३/२०२२

आपला स्नेहांकित
**किशोर मुनोत**
मानद सचिव
पांजरापोळ (गोरक्षण) संस्था, अहमदनगर

---

सुचना :

१) कोरम अभावी सभा तहकूब करावी लागल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभेचे कामकाज सुरू करण्यात येईल व त्यास कोरमची आवश्यकता नसेल त्यात वरील सर्व विषयांचा विचार होईल.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी स्वरूपात दि. २५/०३/२०२२ पर्यंत सुट्टीचा दिवस वगळता संस्थेच्या कार्यालयात दुपारी ५.०० वाजेपर्यंत आणून द्यावेत, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे सभेत दिली जाणार नाहीत.

३) सभेस येताना सभासदांनी अहवालाची प्रत बरोबर आणावी.